# वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

मुख्य प्रशासकीय इमारत, नवीन विक्रीकर कार्यालय, बिडको रस्ता, नवली, ता.जि.पालघर
दुरध्वनी क्र. ०२५२५-२९७००३ e-mail : cafozp.palghar@gmail.com

**प्रेषण प्रमाणपत्र घेऊन**

जा.क्र.पाजिप/अर्थ/वित्त समिती/वशी/ ८३
वित्त विभाग, जि.प. पालघर
दिनांक :०९ /०३ /२०१७.

**नोटीस**

या पत्रान्वये पालघर जिल्हा परिषद अर्थ समितीचे सन्माननीय सदस्य मा.श्री./श्रीम.____________________ मुक्काम__________ पोस्ट__________ तालुका__________ जिल्हा पालघर यांस कळविण्यांत येते की अर्थ समितीची सभा **शुक्रवार दिनांक १७.०३.२०१७ रोजी स.११.३०** वाजता **मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात** आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस हजर राहणेस विनंती आहे.

**टिप :-** गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्यातासाने सभा घेतली जाईल.

**मा.सभापती अर्थ समिती यांचे मान्यतेनुसार.**

**सही/-**
**मा. सभापती अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद पालघर**

**विषय पत्रिका :**

विषय क्र. १.(अ) - मागील अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.
(ब) - मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अंमलबजावणीबाबत.

विषय क्र. २. जिल्हा परिषद पालघरच्या माहे जानेवारी २०१७ च्या मासिक जमा/खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.

विषय क्र. ३. जिल्हा परिषद पालघरच्या सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.

विषय क्र.४. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत माहितीसाठी सादर.**

१.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
२.मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
४.मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
५.खाते प्रमुख(सर्व) ________________ जिल्हा परिषद पालघर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

# अर्थ समिती सभा दिनांक २२.०२.२०१७
## इतिवृत्त भाग -१

| अ.क्रं. | सभेस उपस्थित पदाधिकारी | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|
| १) | **मा. श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्य,** | १) श्री. किरण भिलारे, सचिव तथा उप मु.ले.व वि.अ., जि.प.पालघर |
| २) | मा. श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्य | २) श्री. प्र. म. वैवुडे, लेखाधिकारी (१),वित्त विभाग |
| ३) | मा. श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्य | ३) श्री. बाळकृष्ण र. भोये,लेखाधिकारी (2),वित्त विभाग |
| ४) | मा. श्रीम.चित्रा ह्रदयनाथ किणी, सदस्य | ४) श्री. जी. एम. कांबळे, क.ले.अ, पाणीपुरवठा |
| ५) | मा. श्री. चेतन दिलीप धोडी, सदस्य | ५) श्री. आर.डी. पाटील, स्वीय सहा.मा.उपाध्याक्ष |
| ६) | मा. श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्य | ६) श्री.एस.आर.वंजारी, स.ले.अ, वित्त विभाग |
| ७) | मा. श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्य | ७) श्री.एस.एन.साबळे, क.ले.अ, वित्त विभाग |
| ८) | मा. श्री.किशोर बारकू बरड, सदस्य | ८) कु. ममता ह. संखे, व.ले. (आरोग्य) |
| | | ९) श्री सं.ब.शिरोसे (आरोग्य सहाय्यक) |

माहे फेब्रुवारी २०१७ ची अर्थ समिती सभा बुधवार, दिनांक २२.०२.२०१७ रोजी, स.११.३० वाजता मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात आयोजती करणेत आली होती. त्यानुसार दिनांक २२.०२.२०१७ रोजी, स.११.३० वाजता सभा सुरू करण्यात आली. सदर सभेस मा.सभापती श्री सचिन गजानन पाटिल हे रजेवर असल्याने समिती सचिव व सदस्य यांच्या विनंती नुसार मा.श्रीम.रंजना किशोर संखे यांनी अर्थ समिती सभेचे अध्यक्ष स्थान स्वीकारले. त्यानुसार श्रीम.रंजना किशोर संखे यांनी जि.प.पालघर यांनी उपस्थित सर्व सन्माननीय अर्थ समिती सदस्यांचे स्वागत करून समिती सचिव तथा उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांना सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.

त्यानुसार सभेचे सचिव श्री. किरण भिलारे, तथा उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांनी मा.सभापती यांच्या परवानगीने सभेचे विषय निहाय कामकाज सुरु केले.

**विषय क्रं. १.**

**(अ) मागिल अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.**

अर्थ समिती सभा दिनांक २७.०१.२०१७ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सभागृहात सांगितले. याप्रमाणे दिनांक २२.०१.२०१७ च्या इतिवृतामध्ये सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्याने इतिवृतास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**(ब) मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अमंलबजावणी बाबत.**

दिनांक २७.०१.२०१७ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

**विषय क्रं. २.**

**जिल्हा परिषद पालघरचा माहे डिसेंबर २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून अर्थ समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.**

पालघर जिल्हा परिषदेचे माहे डिसेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत. अर्थ समितीचे सचिव श्री. किरण भिलारे, तथा उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर जमा खर्च तक्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.

सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे डिसेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली.

**विषय क्र. ३.**

**मा. सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.**

सभेपुढे चर्चेकरीता अन्य विषय नसल्याने सचिव श्री. किरण भिलारे, तथा उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा.सभापती यांचे परवानगीने सभेस उपस्थित अर्थ समिती सदस्य, विभाग प्रमुख व त्यांचे प्रती निधी यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा. सभापती,**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष**
**जिल्हा परिषद पालघर**

# अर्थ समिती सभा दिनांक २२.०२.२०१७
## इतिवृत्त भाग -२

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| बुधवार, दिनांक २२.०२.२०१७ रोजी, स. ११.३० वा | **विषय क्र.१ (अ) मागिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.** | अर्थ समिती सभा दिनांक २७.०१.२०१७ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सुचविले. दिनांक २७.०१.२०१७ च्या इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सन्मा. सदस्यांच्या सुचना नसल्यामुळे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | मा.श्रीम. चित्रा हदयनाथ किणी, सदस्या.<br><br>मा.श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ५६ |
| | **विषय क्र.१ (ब) मागील ठरावाच्या अमंलबजावणी बाबत.** | दिनांक २७.०१.२०१७ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा.सदस्यांनी सहमती दर्शविली. | मा.श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्या.<br><br>मा.श्री चेतन दिलीप धोडी सदस्या. | -- | -- | -- | -- |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| | **विषय क्रं .२ .**<br>**जिल्हा परिषद पालघरचा माहे डिसेंबर २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.** | पालघर जिल्हा परिषदेचे माहे डिसेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत.<br>सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे डिसेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली. | मा.श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्या.<br><br>मा.श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ५७ |

सचिव अर्थ समिती
तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

मा.सभापती
अर्थ समिती तथा उपाध्यक्ष,
जिल्हा परिषद पालघर